Tribal Development Dept., Govt. of Maharashtra
Tribal Development Commissionerate
आदिवासी विकास आयुक्तालय
आदिवासी विकास भवन, पहिला मजला, गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक
दूरध्वनी क्र. २५७५६१५, २३१७९३८ ई-मेल :- admnctd.nsk-mh@gov.in
वेबसाईट :- https://tribal.maharashtra.gov.in

जा.क्र. प्रशा-2025/ प्र. क्र.65 / का.2 (8) / 6463 दिनांक- 26 जुलै, 2026

# जाहिर सुचना

## आदिवासी विकास विभाग

## सरळसेवा भरती-2026 चौकीदार (गट-ड )

---

आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांच्या अधिपत्याखालील तसेच नियुक्ती प्राधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (29) यांच्या आस्थापनेवरील **शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहातील (गट-ड)** चौकीदार हे पद मंजुर आहे. सदर 478 **रिक्त** पदाची एकत्रित राज्यस्तरीय जाहिरात दिनांक 29.4.2026 रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

त्याअनुषंगाने सदर पदाची सरळसेवा परिक्षा दिनांक 28 जुलै, ते 01 ऑगस्ट, 2026 रोजी ऑनलाईन पध्दतीने महाराष्ट्रातील विविध परिक्षा केंद्रांवर आयोजित करण्यात आलेली आहे. परंतु, परिक्षार्थीच्या परिक्षा केंद्र बदलांच्या संबंधातील विनंत्या व निवेदने यांचा विचार करता खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

सुचना क्र. 01 :-

**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपुर कार्यालयाकरिता ज्या उमेदवारांने अर्ज केलेला आहे, त्यांची परिक्षा दिनांक 28 जुलै, 2026 रोजी शिफ्ट-02 मध्ये होणार होती, परंतु सदर परिक्षा केंद्रामध्ये व दिनांकात बदल करण्यात येत असुन सदरची परिक्षा दिनांक 02 ऑगस्ट, 2026 रोजी शिफ्ट -01 मध्ये वेळ सकाळी 10.00 वाजता घेण्यात येईल, याबाबत नोंद घ्यावी. सुधारित प्रवेशपत्र (Admit Card) डाउनलोड करुन घेण्यात यावे.**

सुचना क्र. 02 :-

**तसेच उर्वरित प्रकल्पाअंतर्गत ज्या परिक्षार्थींना त्यांनी दिलेल्या परिक्षा केंद्राच्या पसंती क्रमांका व्यतिरिक्त बरेच लांबचे परिक्षा केंद्र मिळालेले आहेत. त्यांचा विचार करण्यात येऊन त्यांचे पुर्वीच्या दिलेल्या परिक्षा केंद्रामध्ये बदल करण्यात येत आहे. परंतु, परिक्षेच्या दिनांकात बदल होणार नाही, याची नोंद घ्यावी व सुधारित प्रवेशपत्र (Admit Card) डाउनलोड करुन घेण्यात यावे.**

**मा. आयुक्त, महोदया यांचे मान्यतेने**

डिगांबर चव्हाण
अपर आयुक्त (मुख्यालय)
आदिवासी विकास आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, नाशिक.